**वि.दि.दा.क्र.१८/२०२२**
**कुरेशी वि भिम**
**नि.क्र.५० वर सुरु.**

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.३ ते ६ तर्फे विधीज्ञ श्री.एस.टी.पाटील यांच्यातर्फे सुरू</u>**

**११.** प्रतिवादी भिम व राजकुमार यांना किती बहिणी आहेत याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी भिम व राजकुमार यांच्या कुटूंबाबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी भिम व राजकुमार यांच्याकडील मिळकत वडीलोपार्जित आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी वाद मिळकत प्रतिवादीच्या आईच्या नावाने असलेले खरेदीखत बघून व्यवहार केला. मला प्रतिवादीच्या आईच्या खरेदीखताची तारीख सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीच्या बहिणीने दावा क्र.वि.दिवाणी दावा क्र.८०/२०१८ दाखल केला होता त्या दाव्यात मी थर्ड पार्टी म्हणून नि.५७ वर अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यात त्यातील वादींना मनाई हुकूम सन २०१८ साली मिळाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.५७ चा अर्ज प्रतिवादी भिम व राजकुमार यांच्याशी संगणमत करून केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा नि.५७ चा अर्ज न्यायालयाने खारीज केला होता. मी सदर आदेशाच्या विरोधात मा.उच्च न्यायालयात गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की,

मा.उच्च न्यायालय यांनी देखील माझा अर्ज खारीज केला. हे म्हणणे खरे आहे की, वि.दि.दा.क्र.८०/२०१८ मधील वादी व प्रतिवादी यांनी तडजोड केलेला आहे. सदर तडजोडीनुसार यातील प्रतिवादी क्र.३ महानंदा चंद्रकांत भद्रे यांना सर्वे क्र.२०९/२००४ मधील ९३ आर जमीन देण्यात आली याबाबत मला माहिती नाही, परंतू, सदर तडजोडीमध्ये सर्वे क्र.२२७ मध्ये ६ आर जमीन देण्यात आली याबाबत मला माहिती आहे. प्रतिवादी क्र.४ लता प्रभाकर कल्याणी यांना सदर तडजोडीमध्ये मौजे उदगीर येथील सर्वे क्र.२०९/४ मधील ९३ आर जमीन देण्यात आली याबाबत मला माहिती नाही, परंतू, सदर तडजोडीमध्ये सर्वे क्र.२२७ मध्ये ६ आर जमीन देण्यात आली याबाबत मला माहिती आहे. सदर तडजोडीमध्ये प्रतिवादी क्र.५ मिना बिरादार यांना सर्वे क्र.२०९/१ मधील ८१ आर जमीन आणि सर्वे क्र.२०९/४ मध्ये १२ आर जमीन देण्यात आली याबाबत मला माहिती नाही. मिना बिरादार यांना सर्वे क्र.२२७ मध्ये ६ आर जमीन देण्यात आली याबाबत मला माहिती आहे. प्रतिवादी क्र.६ सविता भेटे यांना सर्वे क्र.२०९/१ मधील ९३ आर जमीन देण्यात आली याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.५ सविता भेटे यांना सर्वे क्र.२२७ मध्ये ६ आर जमीन देण्यात आली याबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर तडजोडीनुसार प्रतिवादीने अर्ज करून उताऱ्यावर त्यांचे नाव लावून घेतले. फेर

क्र.९०६७/२०२२ हा फेर दि.१६.०७.२०२२ रोजी मंजूर झाला आहे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यामध्ये तडजोड डिक्री झाल्यानंतर सदर प्रतिवादी हे ७/१२ च्या नोंदी नुसार आपापल्या हिश्शावर मालक व ताबेदार म्हणून काबीज आहेत. मला फेर क्र.९०६७ हे मंजूर झाल्याबाबत मला आज पर्यंत माहिती नाही. प्रतिवादी क्र.३ ते ६ यांचे ७/१२ वर नाव आले याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी केलेल्या ठरावामध्ये प्रतिवादी क्र.३ ते ६ यांचे नाव नाही. मी ठराव करण्यापुर्वी जमीनीमध्ये कोणाकोणाचे अधिकार आहेत याबाबतची चौकशी केली होती. मला प्रतिवादी क्र.३ ते ६ यांना भेटण्याचा कधी योग आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या व्यवहाराची मी प्रतिवादी क्र.३ ते ६ यांना माहिती दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ते ६ यांना माहिती न देता प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या बरोबर खोटा ठराव केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा बैनाम्याच्या अनुशंगाने जमीन हडप करावी म्हणून सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी बहिणी यांचा वडीलोपार्जित मिळकतीमध्ये हिस्सा आहे म्हणून मा.उच्च न्यायालयाचे माझा अर्ज खारीज केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिवाणी दावा क्र.८०/२०१८ याबाबत माहिती असताना मी प्रतिवादी भिम व राजकुमार यांच्या सोबत खोटा व्यवहार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी

सदर दाव्यामध्ये अर्ज दिल्यानंतर खोटे कागदपत्र तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी बहिणीचा दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी भिम व राजकुमार यांना पैसे दिले म्हणुन खोटे कागदपत्र तयार केले आहे. प्रतिवादी भिम व राजकुमार यांना दारू पिणे, पत्ते खेळणे असे वाईट सवयी आहेत याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गोष्टींचा फायदा घेऊन खोटे कागदपत्र तयार करून खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यात व शपथपत्रात वादग्रस्त जमीनीवर माझा ताबा आहे हे मी खोटे लिहीले आहे. मी आयकर विवरण भरतो. मी दि.२७.१०.२०१७ रोजी प्रतिवादी भिम यांना २५ लाख रूपये दिले हे माझ्या आयकतर विवरणपत्रात दाखविले नाही. प्रतिवादींना दि.२६.०३.२०१९ रोजी रक्कम रूपये दहा लाख दिले हे माझ्या विवरणापत्रात दाखविले हे मला माझे विवरणपत्र बघुन सांगावे लागेल. दि.३०.११.२०२० रोजी रक्कम रूपये चाळीस लाख दिले हे माझ्या विवरणापत्रात दाखविले हे मला माझे विवरणपत्र बघुन सांगावे लागेल. दि.०९.१२.२०२० रोजी रक्कम रूपये चाळीस लाख दिले हे माझ्या विवरणापत्रात दाखविले हे मला माझे विवरणपत्र बघुन सांगावे लागेल. दि.२७.१२.२०२० रोजी रक्कम रूपये बावीस लाख पचहत्तर हजार रूपये दिले हे माझ्या विवरणापत्रात दाखविले हे मला माझे विवरणपत्र बघुन सांगावे लागेल. दि.२८.१२.२०२० रोजी रक्कम रूपये सतरा लाख विस हजार

रूपये दिले हे माझ्या विवरणापत्रात दाखविले हे मला माझे विवरणपत्र बघुन सांगावे लागेल. दि.१८.०२.२०२१ रोजी रक्कम रूपये एक लाख दिले हे माझ्या विवरणापत्रात दाखविले हे मला माझे विवरणपत्र बघुन सांगावे लागेल. प्रतिवादी क्र.२ राजकुमार यांना दि.२७.१०.२०१७ रोजी रक्कम रूपये पस्तीस लाख दिले हे माझ्या विवरणापत्रात दाखविले हे मला माझे विवरणपत्र बघुन सांगावे लागेल. दि.०८.०३.२०२१ रोजी रक्कम रूपये चाळीस लाख दिले हे माझ्या विवरणापत्रात दाखविले हे मला माझे विवरणपत्र बघुन सांगावे लागेल. मी माझे विवरणपत्र न्यायालयात दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यात आवश्यक पक्षकार यांना सामील केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी बहिणींना हिस्सा मिळु नये म्हणुन प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याशी संगणमत करून खोटा दावा दाखल केला आहे. मी पुढील तारखेपर्यंत माझे विवरणपत्राचे कागदपत्र दाखल करतो.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
स्वाक्षरीत/-

(एम.एस.एम.वाय.रचभरे)

दि.१६/०६/२०२५ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, उदगीर